# भूमिगत मेट्रोचे डबे सुरक्षित

- आठ डब्यांच्या दोन गाड्यांची धाव
- एमआयडीसी-विद्यानगरी दरम्यान १७ किमी अंतर पार

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका असलेल्या मेट्रोचे डबे सुरक्षित असल्याचे निदान झाले आहे. रविवारी सायंकाळी झालेल्या तपासणीत आठ डब्यांच्या दोन गाड्या १७ किमी चालविण्यात आल्या. डबे सुरक्षित असल्याचे निदान झाल्याने अंतिम चाचणी लवकरच होणार आहे.

मेट्रो ३ ही आरे ते कफ परेड मार्गिका उत्तर मुंबईला दक्षिण मुंबईशी पश्चिम उपनगरातून जोडते. या ३३ किमी लांबीच्या मार्गिकेवर २७ स्थानके आहेत. त्यापैकी २६ स्थानके भूमिगत असतील. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा असेल. हा टप्पा येत्या डिसेंबरपासून सुरू करण्याच्या दृष्टीने या मार्गिकेसाठीच्या गाड्या सज्ज केल्या जात आहेत. मेट्रो ३ची उभारणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) करीत आहे. एमएमआरसीतील संबंधितांनी सांगितले, 'मार्गिकेतील पहिल्या टप्प्यासाठी नऊ गाड्यांची गरज आहे. त्यापैकी आठ गाड्या दाखल झाल्या आहेत. यापैकी एका गाडीची चाचणी घेतली जाणार आहे. या चाचणीआधी गाड्यांचे डबे प्रत्यक्ष मार्गिकेवरून चालविण्यात आले. या मार्गिकेतील पहिल्या टप्प्यातील आरे ते बीकेसीदरम्यानच्या एमआयडीसी ते विद्यानगरीदरम्यान हे डबे चालविण्यात आले. यादरम्यान डबे सुरक्षित असल्याची खातरजमा केली गेली.'



## चाचणी पुढील महिन्यात

मेट्रो मार्गिका सुरू करण्याआधी गाडीची चाचणी घेतली जाते. त्याआधी डबे व डबे धावणारी मार्गिका सुरळीत आहे का, याची तपासणी केली जाते. ही तपासणी करण्याआधी एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे, संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता व संचालक (प्रणाली) राजीव यांनी विशेष ट्रॉलीद्वारे पाहणी केली होती. त्यानंतर डब्यांची तपासणी व आता पुढील महिन्यात एका गाडीची आरे ते बीकेसी अशी पूर्ण क्षमतेने चाचणी होईल, असे सूत्रांनी सांगितले.